

# kankavali

(गद्य)

Edition

03

April 2024

Voice Vista

VENTURE BY POOJA PRASUN

www.thevoicevista.com

# kankavali

Voice Vista
VENTURE BY POOJA PRASUN

ORIGINAL SCRIPT : SANJAY KANK

EDITOR-IN- CHIEF MARATHI : SANJAY KANK

IDEATION & CONCEPTUALISATION : POOJA PRASUN

DESIGNER : CREATORS DEN

PROOFREADER : TEAM VOICE VISTA

DISCLAIMER:

THE VIEWS AND OPINIONS EXPRESSED IN THE INTERVIEWS FEATURED IN THIS MAGAZINE BELONG SOLELY TO THE INDIVIDUALS INTERVIEWED AND DO NOT NECESSARILY REFLECT THE OFFICIAL POLICY OR POSITION OF THE MAGAZINE, ITS EDITORS, OR ITS STAFF. THE MAGAZINE STRIVES TO PRESENT A DIVERSE RANGE OF PERSPECTIVES AND EXPERIENCES, BUT INCLUSION OF AN INTERVIEW DOES NOT CONSTITUTE AN ENDORSEMENT OF ANY VIEWS EXPRESSED THEREIN.

FURTHERMORE, THE INFORMATION PROVIDED IN THE INTERVIEWS IS FOR GENERAL INFORMATIONAL PURPOSES ONLY. WHILE WE MAKE EVERY EFFORT TO ENSURE THE ACCURACY AND RELIABILITY OF THE CONTENT, WE CANNOT GUARANTEE THE COMPLETENESS OR TIMELINESS OF THE INFORMATION. READERS ARE ENCOURAGED TO CONDUCT THEIR OWN RESEARCH AND CONSULT RELEVANT PROFESSIONALS FOR SPECIFIC ADVICE OR INFORMATION.

THE MAGAZINE AND ITS CONTRIBUTORS SHALL NOT BE HELD LIABLE FOR ANY LOSS, DAMAGE, OR INCONVENIENCE ARISING FROM THE USE OF OR RELIANCE ON THE INFORMATION PRESENTED IN THE INTERVIEWS. ANY RELIANCE YOU PLACE ON SUCH INFORMATION IS STRICTLY AT YOUR OWN RISK.

WE RESERVE THE RIGHT TO EDIT, MODIFY, OR REMOVE ANY CONTENT DEEMED INAPPROPRIATE, OFFENSIVE, OR MISLEADING. YOUR FEEDBACK IS VALUABLE TO US, SO PLEASE FEEL FREE TO CONTACT US WITH ANY CONCERNS OR QUESTIONS REGARDING THE CONTENT FEATURED IN THIS MAGAZINE.

THANK YOU FOR YOUR UNDERSTANDING AND CONTINUED SUPPORT.

SINCERELY,

KANKAVALI EDITORIAL TEAM

# Editorial Note

Dear Readers,

I am thrilled to introduce you to an exciting new venture - the Kankavali magazine. This concept was born from a profound admiration for the captivating articles penned by Sanjay Sir. Despite his longstanding dedication to Mahindra and Mahindra, his passion for writing shines through in every word he crafts.

Having stumbled upon Sanjay Sir's work, I was instantly captivated. His insights, wisdom, and unique perspective left me utterly mesmerized. It became clear to me that his articles deserved a wider audience, and thus the idea of Kankavali was born.

Within these pages, you'll find a collection of 11 remarkable articles curated from Sanjay Sir's repertoire. Each piece offers a glimpse into his world, his experiences, and his profound understanding of life and business.

I invite you to immerse yourself in the pages of Kankavali, to absorb the wisdom and inspiration that Sanjay Sir so generously shares with us. May his words spark new ideas, ignite passions, and leave a lasting impression on your mind and heart.

Welcome to the world of Kankavali.

Warm regards,

Pooja Prasun

Founder - Owner

Voice Vista

Creators Den

URBAN SPACE




Voice Vista

VENTURE BY POOJA PRASUN

www.thevoicevista.com

# आठवणीतलं साठवणीत



लेखनाकडे मी साहित्याची आवड म्हणून वळलो. यंत्र अभियंता असा शुष्क पेशा असूनही लहानपणापासूनची वाचनाची आवड म्हणजे अगदी गद्य आणि पद्य दोन्हीची आवड जोपासली गेली. आवड असली कि सवड मिळतेच. आपणही लेखन करावं असं मनापासून वाटू लागलं. लेखक नसूनही लिखाण करताना छान वाटू लागलं. त्या लिखाणात दंग होऊन गेलो. मग तो एक छंदच लागला, कारण त्यामागे निर्मितीचा आनंद होता. मनापासून लिहिल्यामुळे ते वाचकांना आवडू लागलं. सकारात्मक प्रतिक्रिया मिळू लागल्या. लिहिण्यातला उत्साह दुणावला.

वाचाल तर वाचाल म्हणतात, तसंच चालाल तर वाचाल असंही म्हणता येईल. कारण चाललं तर व्यायामा इतकंच बघणं आणि अनुभूती अशा त्रिसूत्री घडतात. माणूस वाचावा तितकाच निसर्ग वाचता येतो. भोवतालचं निरीक्षण करताना वाट्याला आलेले विवक्षित क्षण नेमके वेचले गेले. मनाच्या कप्प्यात साठवले गेले. आठवणींचं वारं वाहू लागताच मनातलं पानात अवतरले. हे इवले इवले प्रसंग साहित्याने नटवून लेखणीच्या माध्यमातून आपणा सर्वांसाठी सादर करतोय.

हे लिखित अनुभव वाचताना तुमचे अनुभव देखील जवळपास सारखेच आहेत असं वाटेल. कारण प्रसंग योगायोगाने सारखेच असतात. निसर्ग मानवाचा गुरु असल्याने, निसर्ग आणि माणूस यांचं वागणं, काही अपवाद सोडले तर सारखंच असतं. फक्त स्थळ, काळ, व्यक्ती बदलतात. वाचताना हे जाणवेलच, मग असे अनुभव मनाला चटकन भावतात. मग तो कुठल्याही फुलबाजारातला फेरफटका असो किंवा रेडिओ ऐकणं असो. एखादी सावली असो किंवा शेकोटी असो. अंगण, झोपाळा किंवा एखादी सहल असो. आपण सगळे या सगळ्यांचा अनुभव घेतच असतो. पण काळाच्या पडद्यामागे तो मनात कुठेतरी दडून बसतो. बरेचदा त्या प्रसंगांना चपखल बसणारं एखादं प्रसिद्ध गाणं किंवा एखादी मनस्वी कविता लिखाणाच्या ओघात लिहिलंय. माझ्या नेमक्या भावना व्यक्त होण्यास त्यांची मोठी मदत झाली आहे. त्या गाण्याचं किंवा काव्याचं श्रेय मात्र माझं नक्कीच नाही. व्यक्त होण्याचं ते एक माध्यम आहे.

लेख लिहिला तरी तो वाचकां  पर्यंत पोहचवण्याचं काम तितकंच महत्वाचं. फुलाचा सुगंध वाऱ्याच्या झुळुके शिवाय दूरवर पोहचणार नाही. सुगंधा इतकंच वाऱ्याच्या झुळुकेला महत्व आहे. त्याच झुळुकेचं श्रेय आमच्या या व्हॉइस विस्टा टीमचं आहे.

**- संजय कंक**

Creators Den
URBAN SPACE
Voice Vista
VENTURE BY POOJA PRASUN
www.thevoicevista.com

# kankavali

Voice Vista
VENTURE BY POOJA PRASUN

## अनुक्रमणिका


1. फूल बाजार
2. बाळकृष्ण
3. हा खेळ सवालीचा
4. शेकोटी
5. गुरुमंत्र
6. झोपळा
7. आंगण
8. उंबरठा
9. स्वप्नवत सहल
10. आकाशवाणी

# फुलबाजार

©संजय कंक

Creators Den
URBAN SPACE



नाशिक अनेक गोष्टींसाठी प्रसिद्ध आहे. नाशिकची द्राक्ष आणि वाइन, नाशिकचा चिवडा, विमान कारखाना, यांत्रिकवसाहत, चलार्थ पत्र मुद्रणालय (security press), गोदाघाट, काळाराम मंदिर, कुंभमेळा. थोडक्यात सांगायचे तर मंत्र नगरी ते तंत्र नगरी. या सर्व प्रसिद्ध नामावळीत सामिल होऊ शकेल इतकं महत्वाचं पण तितकंच दुर्लक्षित अजून एकनांव म्हणजे पहाटेपासून सुरु होणारा नाशिकचा फुलबाजार !

सराफ बाजारातील सरकार वाड्या पासून दहीपुला पर्यंत रस्त्याच्या दुतर्फा अनेक फुलविक्रेते विविध प्रकारची फुले, बेल तुळस, हार, गजरे विक्रीला घेऊन बसलेले असतात. हाच तो नाशिकचा प्रसिद्ध फुलबाजार !

फुलबाजारात जाणे म्हणजे एक अविस्मरणीय अनुभव. नाशिकच्या आजूबाजूच्या परिसरातील म्हणजे दिंडोरी, मखमलाबाद, गंगापूर, गिरणारे, पिंपळगाव, ओझर, वडाळी, मातेरी, ढकांबे वै. भागातून शेतकरी विक्रीसाठी फुले घेऊन येतात. कोणी टोपल्या कोणी गाठोडे भरून फुले आणतात, कोणी छोट्या वाहनातून. त्यासाठी पहाटे चार वाजेपासून त्यांची फुलबाजारात येण्यासाठी लगबग सुरु होते. लांबचे शेतकरी ब्राह्ममुहूर्तावर घर सोडतात. पाच साडेपाच वाजेच्या सुमारास फुलबाजारातील आपापल्या ठरलेल्या जागी कापड, गोणपाट अंथरून किंवा टोपल्या भरभरून फुलं विक्री साठी ठेवतात. यात शेतकरी महिला वर्ग आघाडीवर असतो.



साधारणपणे साडेपाचला भरणारा हा बाजार सहा वाजेनंतर खरा जागृत होतो. प्रात:समई चालण्याचा व्यायाम म्हणून निवृत्ती नंतरचं आयुष्य शांतपणे व्यतीत करणारी वरिष्ठ मंडळी विशेषतः ह्या वेळी हजेरी लावतात. व्यायाम, विरंगुळा आणि देवपूजेसाठी फुलं ह्या त्रिसूत्रीवर त्यांचा स्वार्थातून परमार्थ हा कार्यक्रम असतो. तरुण वर्ग देखील गजरे, सजावटी साठी फुलं घ्यायला येत असतो. देवाधर्मा व्यतिरिक्त, विशेष कार्यप्रसंगी, सुखाच्या प्रसंगी आनंद साजरा करायला तर दुःखद समयी भावपूर्ण श्रद्धांजली व्यक्त करायला शब्दांपेक्षा फुलं कामी येतात. सणावारी तर फुलबाजाराला यात्रेचं स्वरूप आलेलं असतं. लाखो रुपयांची उलाढाल होत असते.

फुलबाजारात पहाटेच्या प्रसन्न वेळेला एक चक्कर मारायला मला अतिशय आवडते. मेडिटेशन अर्थात आत्मचिंतनाचा तो एक सुगंधी मार्ग आहे. सगळा बाजार ताज्या, टवटवीत फुलांच्या सुवासाने गंधाळलेला असतो. जिकडे बघावं तिकडे फुलांच्या राशी दिसतात. कोणती फुलं घ्यावी, कुठून घ्यावी हे न उमगून किंवा गंधसुख आणि दृष्टिसुख या द्वयींच्या मोहात अडकून मी बाजारात फक्त चकरा मारत असतो.

सराफ बाजारातील सोन्याशी स्पर्धा करणारा पिवळ्याधम्म रंगाचा झेंडू आपल्या टप्पोऱ्या गेंदेदार आकाराने मला मोहात पाडतो. त्याचा केशरी रंग देखील मला तितकाच भावतो. असा पिवळा केशरी गेंदेदार झेंडू मला समृद्धीचं प्रतीक भासतो. नवरात्री, दसरा, दिवाळी, लक्ष्मी पुजन या महत्वाच्या सणांना म्हणूनच झेंडूच्या फुलांचं अनन्यसाधारण महत्व आहे.

kankavali



पांढराशुभ्र, लांबसडक निशिगंध आपल्या अंगभूत सुवासाने धुंद करतो. त्याची स्पर्धा असते ती सराफ बाजारातील धवल चांदीशी. असा निशिगंध मला शुचिर्भूततेचं प्रतीक वाटतो. पाटीभर निशिगंध लांबून बघितला तर पांढऱ्या शुभ्रचांदण्या गोळा करून ठेवल्याचा भास होतो.


पांढरी, पिवळसर झाक असलेली शेवंती. सुरेख साचेबद्ध आकार आणि मंद सुवास असलेली शेवंती मला मांगल्याचं प्रतीक भासते. देवघरात श्रद्धापूर्वक नतमस्तक होतो.

लाल, गुलाबी, पांढरा, पिवळ्या रंगातला टप्पोरा, भारदस्त पण आकर्षक आकाराचा, फुलांचा राजा गुलाब. प्रेम, मैत्री, आदर, सद्भावना या संस्कारांचं  प्रतीक आहे.

मोगरा ! मंत्रमुग्ध करणारा सुवास, पांढराशुभ्र रंग आणि दृष्टी खिळवून ठेवणारा आकार. श्रद्धा अन भक्तीचं प्रतीक असणारा मोगरा देखील चांदीचा स्पर्धक आहे. याला रसिकतेची, प्रीती अन रंगीलेपणाची देखील जोड आहे.

नाजूक जाई जुई आणि पारिजात. खानदानी सुवास. प्रसन्नतेचं आणि सोज्वळतेचं प्रतीक. बाजारात यांचं अस्तित्व खूप क्वचित. पारिजात तर सोनचाफ्यासारखा बाजारात दुर्मिळच.

फुलांइतकंच महत्व असलेली बेल, तुळस ! आपला खास गंध घेऊन आलेली बेल तुळस विरक्ती अन् भक्तीचं प्रतीक आहे. औषधी गुणधर्मही  भरपूर आहेत.



विदेशी नांव असलेला जर्बेरा. पांढरा, पिवळा, लाल रंग असलेला. आकार असा की छोट्या स्वरूपातील सूर्यफूल भासावे. नयनमनोहर रूप आणि रंग. शोभेसाठी अति सुंदर. यांच्या सोबत मोरपंखी, गुलकाडी तत्सम पर्ण वर्गातील छोट्या काड्या मिळतात. अतिसुंदर जांभळ्या रंगातील ऑर्किड फुलं मिळतात. यांचा पांढरा, गुलाबी देखील रंग असतो. या सर्वांचा देखणा पुष्पगुच्छ बनवतात. मोठा तोरा अन् श्रीमंती थाटमाटाचं प्रतीक यांच्यात भासतं.

या सर्व थोर अन मान्यवर मंडळीत एका बाजूला, ढीगभर लाल पांढरा तेरडा मुकाट बसलेला असतो. मला असं वाटतं, परमेश्वर जेव्हा सर्व फुलांना बोलावून त्यांच्यावर मुक्त हस्ताने रंग, रूप अन् गुणांची उधळण करत होता तेव्हा हा आळशी, चुकार तेरडा चाळणी घेऊन गेला असावा. त्यामुळे त्याच्या वाट्याला रंगा शिवाय काही आलं नाही. जे हाती आलं तेही तो खर्चून कफल्लक झाला. त्यामुळे, खानदानी श्रीमंत, गुणसंपन्न, ऐश्वर्य संपन्नांच्या पंक्तीत एखादा निर्धन नातेवाईक बसावा तसं तेरड्याला बघून वाटतं.

या सर्व फुलांकडे बघून वाटतं, ह्यांना माणसाने गुरु करावं. जे क्षणभंगुर आयुष्य देवाने दिलंय, त्या वेळात आपल्या जवळची रंग रूपाची सर्व मिळकत मुक्त हस्ताने ते कुठलाही भेदभाव न करता उधळून टाकतात.

मन जेव्हा अस्वस्थ, उदास होतं आणि त्याला जेव्हा पूर्वपदावर आणण्याची गरज भासते, तेव्हा त्याच्या उत्तम आरोग्याचा, मनन- चिंतनाचा गंधाळलेला मार्ग मी शोधलाय.
तो फुलबाजारात जातो !

Ideation & Conceptualisation of Magazine: Pooja Prasun
Original Content | Edited By: Sanjay Kank
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den

kankavali

# बाळकृष्ण

©संजय कंक

Creators Den
URBAN SPACE





मे महिन्यातील एक उष्ण सकाळ. सूर्यनारायणाने सकाळपासूनच आग ओकायला सुरूवात केली होती. मी सुट्टीत घरी आलो होतो. वाचन करत बसलो होतो. देवघरात आजीची पूजा सुरु होती. ती आजोबां नंतर संपूर्ण घराचा आधार झाली होती. मोठी कर्तबगार. अलीकडे जरा जास्त थकल्या सारखी दिसतेय. आजी तशी देवभोळी. बाळकृष्णावर तिची अपारश्रद्धा. पूजा, नैवेद्य, आरती झाल्या शिवाय तिने उंबरठा कधी ओलांडला नाही. आजीच्या आरतीचे सूर कानी पडत होते. ती आरती खूप छान म्हणते --

" अरे माझ्या गोपाळकृष्णा
 तुलाच करिन मी आरती,
मुकुटाची शोभा, चंदनाची प्रभा
तुळस मंजिरी वाहीन वरती ---"

घराचं कायापालट करायचं काम सुरु होतं. मागच्या आठवड्यापासून एक तरुण जोडपं खोदकामासाठी, कंत्राटदाराने पाठवलं होतं. त्या दोघांचं काम सकाळ पासून सुरु होई. तुकाराम तिशीच्या जवळपासचा तरुण. काळासावळा, पिळदार देहयष्टीचा. यशोदा त्याची बायको. सत्तावीस वय असावं. सावळा वर्ण. पाणीदार डोळे. धारदार नाक. सडपातळ, हसऱ्या चेहऱ्याची. त्या दोघांसोबत त्यांचं एक वर्षाचं लहान मूल. एकदम गुटगुटीत. सावळ्या रंगाचा, दाटकुरळ्या केसांचा, गोड चेहऱ्याचा. हसला की गोबऱ्या गालांना दोन्ही बाजूला छान खळी पडायची. त्याला पाहिलं की पटकन कडेवर उचलून घेण्याचा मोह कुणालाही व्हायचा.

काल आजी यशोदाशी बोलत होती, तिची चौकशी करत होती. लोकांना बोलतं करण्याची कला आजीला चांगली अवगत आहे.

तुकाराम आणि यशोदा बीड जवळील खेडेगावातून कामधंद्याच्या शोधात आलेली. त्यांच्या गावातच नव्हे तर पंचक्रोशीत दुष्काळाच्या झळा तीव्र झाल्या. पाण्याचे खूप दुर्भिक्ष्य. जनावरांचे तर प्रचंड हाल. त्यांची उपासमार बघवेना. मग गावातील साऱ्या जनावरांच्या दावणीचा दोर सोडला आणि तुकारामाचं सबंध गाव अन्नपाण्यासाठी वाट फुटेल तिकडे निघालं. ज्याला जसं काम मिळेल, तसा तिथे तो स्थिरावला. यशोदा नवऱ्याच्या बरोबरीने काम करे. चुणचुणीत यशोदा मिळेल ते काम चटकन आत्मसात करे.

रविवारची सकाळ जरा निवांतपणा घेऊन येते. जाग आली ती यशोदेच्या तान्हुल्याच्या किरकिरीने. जरा आळसानेच उठलो. थोड्या वेळात पोराची किरकिर रडण्यात रूपांतरित झाली होती. आज काही केल्या तो शांत होत नव्हता. यशोदा त्याला नाना तऱ्हेने शांत करण्याचा प्रयत्न करत होती पण त्याचं रडणं काही केल्या थांबत नव्हतं.

आजीची देवपूजा चालू होती. तिला पूजेत व्यत्यय आलेला अजिबात चालत नसे. आत्ता यशोदेचं काही खरं नाही असाविचार करत मी अंघोळीला पळालो. पोराचा रडण्याचा आवाज टिपेला पोहचला होता.

मी अंघोळ आटोपून नमस्काराला देवघरात आलो. आजी देवघरात नव्हती. जरा आश्चर्यच वाटलं. अजून आजीची आरती कानी पडली नव्हती, म्हणजेच तिची पूजा अजून संपली नव्हती. पूजा अपूर्ण सोडून गेली कुठे? पोराचा रडण्याचा आवाज देखील येत नव्हता. काय झालं असावं? विचार करत खिडकीतून बाहेर डोकावलो--

kankavali

डोळ्यांवर विश्वासच बसेना. चमत्कार पहिला. आजी पूजे अगोदर चक्क घरा बाहेर होती. पोरगं तिच्या मांडीवर होतं. आजीच्या हातात बाळकृष्णासाठी घेतलेली चांदीची नैवेद्याची वाटी होती.
नैवेद्याची खडीसाखर आजी पोराला भरवत होती. पोरगं नुसतंच शांत झालं नव्हतं तर गालावर खळ्या पाडून गोड हसत होतं.

मी परत देवघरात आलो. समईच्या शांत, स्निग्ध प्रकाशात देव्हाऱ्यातील बाळकृष्णाच्या मूर्तीकडे पाहिलं. बाळकृष्णाची मूर्ती हसत माझ्याकडेच पाहतेय असं भासलं. देवघर एका सात्विक समाधानाने भरून गेलं होतं. आजी ज्याला मूर्तीत शोधत होती तिचा तो *बाळकृष्ण*, तिला माणसात सापडला होता !






Ideation & Conceptualisation of Magazine: Pooja Prasun
Original Content | Edited By: Sanjay Kank
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den


kankavali

Creators Den
URBAN SPACE

# हा खेळ सावलीचा

©संजय कंक






भर दुपारची रणरणती वेळ. बाहेर बघितलं तर सूर्यकिरणं त्यांच्यातील पूर्ण ऊर्जेने आणि उत्साहाने भूतलावर मारा करत होते. झाडाचं एक पान देखील हालत नव्हतं. जणू त्या सूर्यकिरणांच्या तेजाने सारी वृक्षवल्ली स्तिमित होऊन अंग चोरून शांत उभी होती. लक्ष वेधायला झाडाच्या पानांच्या सळसळीचं संगीत नव्हतं पण त्या झाडाच्या पायाशी असलेल्या सावलीने मात्र लक्ष वेधून घेतलं. आजूबाजूच्या भट्टी सारख्या तप्त वातावरणात, जिथे रस्त्यावर चिटपाखरूही दिसत नव्हतं अशा वातावरणात एक गोमाता, एका झाडाच्या दाट सावलीत शांत पणे रवंथ करत बसलेली होती. इतक्या तप्त वातावरणात, त्या झाडाखाली ती फक्त बसली नव्हती तर अति सुखाने डोळे मिटून, आत्मानंदी ढंग होऊन तिचं ते रवंथ चाललेलं होतं. एकसारखे कान हलवत ठेवून, कातडी थरथरवत आणि अंगाभोवती शेपटीचा झाडू फिरवत नको असलेल्या उपद्रवी माशांसारखे कीटक ती उडवून लावत आपली समाधी अवस्था जपत होती. अशा तप्त वातावरणातही गाय इतकी सुखासिन कशी ? दूरवर एक भलं मोठं वडाचं झाड होतं. त्याच्या दाट सावलीत मुलांचा खेळ रंगात आला होता. कोणी गोट्या खेळत होतं, कोणी सापशिडी. कोणी त्या झाडाच्या पारंब्यांना धरून मस्त्या करत होतं, एखादं अवखळ लेकरू आईच्या कुशीत शिरून पदराशी खेळत बसावं तसं. पलीकडे पाच सात म्हातारी माणसं बुंध्याला टेकून बसली होती. त्यांच्या गप्पांचा फड रंगात आला होता. अंगाची लाही लाही करणाऱ्या या वैशाख वणव्यात ही लहानथोर मंडळी इतकी हसत खेळत कशी ? याचं उत्तर अर्थातच त्या झाडाची सावली.

एक सावली अशी जादू करू शकते ? पण मग लक्ष बाजूलाच असलेल्या एका पत्र्याच्या होर्डिंग कडे गेलं. त्याचीही तर सावली पडली होती. त्या सावलीच्या आश्रयाला मात्र कोणीही नव्हतं. असं कां ? पलीकडे चार पाच झोपड्या होत्या. वर पत्रे टाकून छप्पर केलेल्या. त्या झोपड्यांमध्येही सावली होती. पण त्या सावलीत थांबायची त्या झोपडीतल्या मंडळींची इच्छा नव्हती कारण तापलेल्या पत्र्यांची सावली म्हणजे कुंभाराचा धगधगता आवा. नुकतंच घडवलेलं मडकं आत ठेवलं तर खरपूस भाजलं जाईल. त्यापेक्षा झोपडी बाहेरच्या उन्हात कदाचित थंडावा मिळेल अशी परिस्थिती. मग मनुष्य देहाचं मडकं खरपूस भाजून घेण्यापेक्षा बाहेर निसर्गाच्या वातानुकुलीत यंत्रणेत मजेत बसण्या सारखं दुसरं सुख नाही.

झोपडीच्या समोरच एक कडुनिंबाचं झाड होत. त्याच्या सावलीत त्या झोपडीतील काही मंडळी आरामात बसली होती. काही योगनिद्रा घेत होती. काही मंडळी सुखात आडवी झाली होती. लक्ष वर झाडाकडे. हवेच्या झोता बरोबर कधी पिवळ्या धम्म लिंबोळ्या टप्पकन खाली पडत. एका झुळुके बरोबर त्याच्या इवल्या इवल्या पानांची मंजुळ सळसळ व्हायची. कधी त्या संगीताच्या तालावर कडुलिंबाची ती इवलीशी अर्धचंद्राकृती आणि करवती पानं असंख्य गिरक्या घेत अलगद जमिनीवर उतरत. त्यांच्या बरोबर जणू दिवसा आकाशातील चांदण्याचा शिडकावा होतोय असं भासवणारा तो नजारा डोळ्यात साठवत ती मंडळी त्या झाडाकडे एकटक भान हरपून बघत असावी. झाडाच्या खालच्या फांदीवर दोर बांधून झोळी केली होती. झोळीला एक जुनाट लुगडं बांधलेलं होतं. त्याला खुप ठिकाणी भोकं पडलेली होती. या कडुनिंबाची सावली म्हणजे हीच ती निसर्गाची स्वतःची अशी वातानुकुलीत यंत्रणा. त्यात विरलेल्या लुगड्याच्या भोकांमधून हवा खेळती रहात असावी कारण झोळीच्या आत एक निरागस मुल शांतपणे झोपी गेलं होतं.


kankavali



झाडावर एखाद्दा कावळा त्याच्या सुरेल(?) आवाजात अंगाई म्हणत होता. त्याच्या सूरात सूर मिसळायला काही चिमण्या होत्या, एखादी कोकिळा नुकतीच सावलीत विसावली होती, ती देखील पाहुण्या कलाकारा सारखी एक लकेर गाऊन गेली. एरवी सुसाट इकडे तिकडे पळणाऱ्या खारुताई उन्हाच्या दमून भागून, तो झोपळा टांगलेल्या फांदीवर, आपल्या ओंजळीतून काही खात, मजेत शेपटीचा झुपका उडवत बसल्या होत्या. जणू निसर्गाने त्या झोपाळ्यावर जिवंत खेळणं ठेवलं होतं, ते बाळ उठलं तर त्याला रिझवायला. ही सारी किमया त्या एका थंडगार सावलीचीच नव्हती कां ?

सावली ! एक शब्द, अनेक अर्थ. सजीवाची असेल तर वेगळ्या संवेदना, वेगळ्या भावना, वेगळी जाणीव, वेगळा स्पर्श. निर्जीवांच्या सावली पेक्षा कितीतरी वेगळेपण असावं या सजीवांच्या सावलीत. म्हणूनच सजीव सावलीच्या आश्रयाला अनेकजण जातात. त्यातही सजीवा सजीवांच्या  सावलीतही अनेक फरक असावेत. म्हणूनच कुठल्याही झाडाच्या सावलीच्या आश्रयाला कुठलाही सजीव जायला आनंदाने तयार असतो, पण समस्त मानव जातीच्या सावलीत त्याचेस्वतःच्या मर्जीतले असे सजीव सोडले तर दुसरं कोणी जात नाही, अगदी जबरदस्ती केली तरीही. झाडाची सावली सदा मायेचा ओलावा, गंधाळलेला थंडावा,  स्वप्नवत आनंद देते आणि हे देताना तिच्याजवळ कुठलाही आपपर भाव नसतो. माणसाची सावली हे सारं तितक्याच निस्वार्थीपणे आणि निष्पक्षपणे देईलच याची खात्री नाही.

सावली म्हणजेच छाया. शास्त्रीय परिभाषेत सावली म्हणजे प्रकाशाची अनुपस्थिती. या सावली मुळेच सूर्यग्रहण आणिचंद्रग्रहण होतात. चंद्राच्या किंवा पृथ्वीच्या सावलीमुळे ही ग्रहणे दिसतात. सावली आणि प्रकाशाचा हा खेळ म्हणजेच ग्रहण. एक क्षुल्लक सावली सूर्या सारख्या दैदिप्यमान ताऱ्याला देखील ग्रहण लावते. अशी महती या सावलीची आहे. ही सावली एखाद्याला नुसती झाकोळातच नाही तर त्याची वाढ खुंटवते. म्हणुन म्हणतात मोठ्या झाडाच्या सावलीत किंवा खुप कर्तृत्ववान माणसाच्या छत्रछायेत दुसऱ्याची वाढ होत नाही. आकाश भरारी घ्यायला स्वतः तळपत्या उन्हात होरपळुन निघावं लागतं. जसं टाक्याचे घाव सहन केल्या शिवाय देवपण येत नाही तसंच हे उन्हाचे चटके सहन केल्या शिवाय मोठेपण येत नाही.



माणसाची सावली नेहमीच त्याच्या पायाशी असते आणि ती त्याची साथ कधीही सोडून जात नाही. पण एक खगोलशास्त्रीय सत्य आहे, जेव्हा सूर्य नेमका डोक्यावर असतो तेव्हा माणसाची किंवा वस्तूची सावली अजिबात दिसत नाही याला शून्य सावली दिवस म्हणतात. हे दिवस वर्षातून दोनदा येतात, तेव्हा माध्यान्हीचा सूर्य अगदी अचूकपणे डोक्यावर असतो. इतर वेळी उगवत्या सूर्या बरोबर सावल्या लांबच लांब असतात. सूर्याचा जसा पश्चिमेकडे प्रवास सुरु होतो, त्यादरम्यान मध्यान्हा पर्यंत सावल्या लहान होत जातात. डोक्यावरचा सूर्य ढळला की परत या सावल्या लांब पसरायला लागतात. दूरदर्शन नव्हतं तेव्हा रेडिओवर क्रिकेट समालोचन प्रसारित होत असे. चहापाना नंतरच्या खेळाचं धावत वर्णन करताना," धीरे धीरे खिलाडींयो की परछाईया लम्बी  होती जा रही है !" असं हमखास एक वाक्य असायचं. म्हणजे सूर्य अस्ताला पोहचला आहे आणि खेळ संपायची वेळ झाली आहे. तेव्हा पासून लांब सावल्या आणि अंतीम वेळ यांचं एकनातं आहे असं लक्षात आलं.

इतक्या या बहुगुणी, बहुआयामी सावलीने अनेक कवी, गीतकार, लेखकांना आणि चित्रपट निर्मात्यांना आपली भुरळ घातली आहे. मराठी भाषेला या सावलीने अनेक वाक्प्रचार देऊन अलंकृत केलं आहे. कोणाच्या सावलीला उभं राहू नये म्हणजे त्या व्यक्तीला टाळावं, त्याची सावलीही त्याला सोडून गेली म्हणजे एखाद्यावर वाईट वेळ येणे. या सावल्यांचं, भीती किंवा गूढतेशी अधीक घट्ट नातं निर्माण केलं गेलंय. "हा खेळ सावल्यांचा" हे नाव भय आणि गूढ कथानका साठी प्रसिद्ध आहे.

kankavali

प्रत्येक यशस्वी स्त्री किंवा पुरुषामागे अशीच एक कोणाची तरी सजीव सावली त्यांच्या सोबत असते, कायमची. ती सावली त्यांना कधीही सोडून जात नाही. आयुष्यात प्रखर तापाचे, चटके देणारे जे काही क्षण येतात, तेव्हा या सावलीतच ते यशस्वी जन घटकाभर विसावून ताजेतवाने होतात. कारण या त्यांच्या 'स्व'जीवांच्या सावलीत, मायेचा ओलावा असतो त्या जीवांच्या जीवनरसाचा. आपणही कोणासाठी अशी सुखदायी सावली होण्याचा प्रयत्न करूया !






Ideation & Conceptualisation of Magazine: Pooja Prasun
Original Content | Edited By: Sanjay Kank
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den

# शेकोटी

©संजय कंक

Creators Den
URBAN SPACE





कडाक्याची थंडी सुरु झाली की समस्त गावकऱ्यांना वेध लागतात ते ही थंडी क्षणात पळवून लावणाऱ्या शेकोटीचे. दिवाळी नंतर हवेत गारवा उतरू लागतो. हळुहळु बोचऱ्या थंडीत तिचे रूपांतर होते. एकेदिवशी कोणाला तरी जाणीव होते शेकोटी पेटवायला हवी. मग चौका चौकात शेकोट्या पेटू लागतात.

शेकोटी करायला एखादे लाकूड पूरेसे असते. सभोवतीचा काडी कचरा, कागदं, वाळलेली पाने देखील चालतात. थोडक्यात सांगायचं तर स्वतः जळत राहून दुसऱ्याला उब देण्याचा गुणधर्म असलेलं काहीही चालतं.

शाळेत असताना हिवाळ्यातील भल्या पहाटे उठून शिकवणीसाठी सकाळी सहा वाजता तयार होऊन जावं लागे. त्यासाठी पहाटे पाच वाजता उठायचं म्हणजे मोठी शिक्षा वाटे. अंगावरची गोधडी बाजूला करणं म्हणजे कसोटीचा क्षण. एकदा तो साध्य झाला की अर्धी लढाई जिंकली. मग सरांच्या घराजवळ आलो अन् पाच दहा मिनिटं वेळ असेल तर तेवढ्या वेळात जवळच एकाद्या शेकोटीच्या सानिध्यात अंग गरम करताना स्वर्गसुख वाटे. तेव्हा पासून शेकोटी मनात उब देतेय.

पहाटे जेव्हा हळुहळु गावं जागं होतं तेव्हा, कोणी एक शौकीन प्रथम शेकोटी पेटवतो. एकेक शेजारी घराबाहेर पडला की ते सगळे शेकोटी भोवती गोळा होतात. मग मस्त पैकी गप्पांचा फड रंगतो. सुख दुःखाची देवाणघेवाण होते, सल्ले दिले घेतले जातात ते या शेकोटीच्या साक्षीनेच. सूर्यनारायण हातभर वरती आला की मग ही मंडळी सावकाश आपापल्या कामाला जातात. जे चित्र सकाळी असतं, जवळपास तसंच चित्र संध्याकाळी देखील पाहायला मिळतं. रात्रपाळीवर काम करणाऱ्या समस्त व्यक्तींसाठी, गुरखा, सोसायटीचे रखवालदार, गस्तपथक, यांच्यासाठी शेकोटी एका साथीदाराचं काम करते. सगळं जग झोपलं असताना या मंडळींना सोबत असते ती फक्त या शेकोटीचीच.

शेकोटी पेटली की तिच्या त्या पिवळ्या नारंगी लवलवत्या ज्वाळांकडे बघत बसणं ही एक सुंदर अनुभूती असते. दोन्ही तळहात पुढे करून शेक घेणारा, शेकोटीची धगधगती उब जणू दोन्ही हातांनी भरभरून आपल्या अंतरंगात सामावून घेतो. अगदी "अनंत हस्ते देता कमलाकराने, देता किती घेशील दो करांनी" अशी अवस्था असते.


kankavali

एकटक त्या ज्वाळांकडे बघताना अनेक नकारात्मक विचार त्या पेटत्या शेकोटीत जळून खाक होतात. कधी काही स्वप्ने, मनोराज्ये शेकोटीच्या सहवासात धगधगत्या निखाऱ्यासारखी स्फुल्लिंगीत होतात. खुप साऱ्या सकारात्मक विचारांची ऊर्जा मनाला आणि विस्तवाची उब शरीराला मिळते ती ह्या शेकोटीच्या सानिध्यातच, हे एक वास्तव आहे. शेकोटीचा तो परिचित आणि हवाहवासा धुराचा वास अंगभर लपेटून राहतो, त्या सुवासात थंडी अगदी विरघळून जाते.

शेकोटीची वेगवेगळी रूपं देखील आहेत. पाश्चात्य देशात विशेषतः इंग्लंड मध्ये भिंतींत "फायर प्लेस" म्हणजे शेकोटीच असते. बरेच ठिकाणी लोखंडाच्या पाटीमध्ये कोळश्याच्या निखाऱ्याच्या स्वरूपात किंवा लाकडाच्या छोट्या ढलप्या पेटवून शेकोटी होते. कधी तीन दगडांची चूल मांडून तर कधी मातीच्या चुलीतील जाळाचा उपयोग पाणी तापवतांना किंवा स्वयंपाक करता करता शेकोटी म्हणूनही होतो.

ही शेकोटी बहुउपयोगी आहे. काटक्या गोळा करायच्या, मध्ये भरिताची वांगी ठेवायची, वरती परत काड्यांचा थर ठेवला की तयार होणाऱ्या शेकोटीत वांग्यांबरोबर आपलं शरीर भाजत बसायचं. कधी हरबरा, हुरड्यासाठी कणसं असा बदलही करता येतो. त्या शेकोटीवर भाजलेल्या या जिन्नसांना जो धुरकट वास येतो त्यामुळे खाण्याची लज्जत शतपटीने खुलत जाते. कधी चुकून जंगलात मुक्कामाची वेळ आली अन जवळ पांघरायला नसेल तर शेकोटीच्या सानिध्यात छान विश्रांती होते. प्रसंगी जंगली श्वापदांपासून संरक्षणार्थ उपयोग होऊ शकतो. या सगळ्यां पेक्षा सर्वात मोठा उपयोग म्हणजे माणसां मध्ये आपसातील प्रेम, आपुलकी, नातं आहे त्यापेक्षा दृढ आणि वृद्धिंगत होतं ते शेकोटीच्या सानिध्यात.

एकदा नांदूर मध्यमेश्वरला मुक्काम होता. दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे पक्षी निरीक्षण करण्यासाठी बाहेर पडलो. गावतसं लहान होतं. नुकतीच गावाला जाग आली होती. धुक्याची पहाट, गुलाबी थंडी अन रोजची सवय ह्यामुळे पहिले चहा कुठे मिळतो कां यासाठी शोधाशोध सुरु झाली. चार दोन ठिकाणी शेकोटी पेटली होती. भोवती अंगावर चादर लपेटून मंडळी शेकत बसली होती. चहाची टपरी कुठे आहे कां विचारल्यावर उत्तर आलं गावात इतक्या सकाळी काहीच मिळणार नाही. मग एका ठिकाणी शेकोटी जवळच थांबून थोडं शेकत बसलो. पुरेशी उब मिळताच, तोंडातून शब्द बाहेर पडायला लागले. तिथल्याच मंडळींना योग्य त्या आर्थिक मोबदल्यात चहा देण्याची विनंती केली असता, गावकऱ्यांनी त्वरित मान्यता दर्शवली.






kankavali

चुलीवरील चहाचा तो गरमागरम कप हातात घेऊन पहिला घोट घेतल्यावर चहाला अमृत तुल्यकां म्हणतात ते क्षणात कळले. मग थोड्या गप्पा रंगल्या, अगत्याची उब निर्माण होताच चहाच काय पण नाश्ता अन जेवणाची देखील सोय त्या गावकऱ्यांनी करून दिली. माणसांमध्ये अशी प्रेमाची उब निर्माण करण्याची ताकद फक्त शेकोटीतच आढळते.

खूप जवळ आलं की चटका देणं आणि खूप लांब गेलं की उब कमी होणं, असा मानवी स्वभाव वैशिष्ठ्याला साधर्म्य असलेला जिचा गुणधर्म आहे ती म्हणजे आपली ही शेकोटी !






Ideation & Conceptualisation of Magazine: Pooja Prasun
Original Content | Edited By: Sanjay Kank
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den

kankavali

# गुरुमंत्र

©संजय कंक





श्रावण माझा आवडता महिना.
अगदी अनेक कारणांमुळे. सणवारांची रेलचेल. पानाफुलांचा बहर. पावसाच्या सुखावणाऱ्या सरी. मध्येच डोकावणारे सूर्यकिरण. सर्वदूर हिरवाई. या सर्वांमुळे होणारं मंगलमय वातावरण. मन प्रसन्न असतं.

सुट्टीच्या दिवशी आवडता कार्यक्रम म्हणजे भटकंती. मला आणि माझ्या पत्नीला, विशेषतः त्र्यंबकेश्वर जवळपासच्या परिसरात जाणं फार आवडतं. कारण तो परिसर म्हणजे सृष्टी सौंदर्याची मेजवानीच.

रस्त्याच्या दुतर्फा उंच झाडी, काळ्याकभिन्न, राकट डोंगराचं रूप पालटून त्याला मार्दव, प्रेमळ रूप देणारी हिरवळ, हिरव्याकंच खोल दऱ्या, त्या डोंगरमाथ्यावरून झेपावणारे आणि अचानक दऱ्यांच्या कुशीत लुप्त होणारे धबधबे. भान हरपून बघत राहावं असं हे निसर्गाचं आगळं वेगळं रूप.

अशीच एकदा आम्हा दोघांची भटकंती चालू होती. नुकतीच पावसाची एक सर येऊन मन, रान आणि रस्ते चिंब भिजवून गेली होती. जिकडे नजर जाईल तिकडे हिरवं रान दृष्टीस पडत होतं. वीतभर वाढलेली पिकं आणि हातभर वाढलेलं गवत वाऱ्याच्या झुळुकेवर मस्त डोलत होतं. मध्येच त्या हिरव्या रानात पांढऱ्या शुभ्र रंगाचे चार दोन बगळे लक्ष वेधून घेतहोते. ते बगळे त्यांचं खाद्य शोधण्यात मग्न होते.


रस्त्याच्या बाजूने पाण्याचे ओहळ वाहत होते. रस्त्यांना पडलेल्या खड्ड्यांना चुकवत संथगतीने, निरीक्षण करत आणि एकंदर त्या लोभस वातावरणाचा आस्वाद घेत आमचा प्रवास सुरु होता.

मुख्य रस्त्यापासून बरंच अंतर आत गेल्यावर दोन महिला रस्त्याच्या कडेला एखाद्या वाहनाच्या प्रतीक्षेत उभ्या दिसल्या. खूप वेळानंतर त्यांना एखादं वाहन दिसलं असावं कारण त्यांनी आमची गाडी दिसताच त्वरित हात दाखवत थांबण्याची विनंती केली.

अगदी आतून आवाज आल्यासारखा मी थांबलो. आजीच्या डोक्यावर एक छोटंसं गाठोडं होतं तर दुसरी, कदाचित तिची मुलगी किंवा सून असावी, तिच्या हाती एक पिशवी. दोघी जणी अवचित येणाऱ्या हलक्या पावसाच्या सरीने भिजल्या होत्या. गारठल्या होत्या. मी गाडीचा दरवाजा उघडून देताच आत येऊन बसल्या.

kankavali

"आजी, कुठे जायचं आहे ?" मी विचारातच आजी म्हणाली, "देवरगावजवळ सोड पोरा. तिथून जवळच वस्ती आहे. तिथे गाडी जात नाही. पायी जावं लागतं दोन फर्लांगभर ." दोघी गाडीत संकोचाने अवघडून बसल्या होत्या.




आजी हळूहळू गप्पा मारू लागली, माहितीची देवाणघेवाण सुरु झाली. ह्या दोघी सासू सुना. कुणाच्या मळ्यात कामाला आणि वस्तीला होत्या. नेहमीप्रमाणे नाशिकला भाजी, फुलं, केळीची पाने विकायला नेली होती. येताना चार दोन वस्तू , मीठ मिरची वैगरे वाणसामान घेऊन चालल्या होत्या.

परतीच्या प्रवासाला मिळेल त्या वाहनाने, त्रंबकेश्वरच्या अलीकडे पोहचल्या. या भागात एस टी ची बस येत नाही. पुढे जायला वाहन न मिळाल्याने या भागात ये - जा करायला असणाऱ्या काळी-पिवळी वाहन सेवा मिळण्याची वाट बघतउभ्या होत्या.

दरम्यान आजीच्या वस्तीजवळ असलेला कच्चा रस्ता जवळ दिसू लागला. आजीची चुळबुळ सुरु झाली. "थांब पोरा इथं. आम्हाला उतरू दे." आजी आणि सुनबाई आपल्या जवळील सामानासह खाली उतरल्या.

"पोरा, किती पैसं देऊ ?" आजीने विचारलं. कमरेला खोचलेला कसा, म्हणजे चंची सारखी पैसे ठेवायची कापडी पिशवी खसकन ओढत आणि त्यातून पन्नास रुपयाची मळकी, चुरगळलेली नोट बाहेर काढत आजीने हळू आवाजात विचारलं. "नाही, नाही. काही काय आजी, एकही पैसा नको." मी सांगताच आजी म्हणाली, "मग घराकडे चल. थोड्या भुईमुगाच्या शेंगा देते, त्या तरी घेऊन जा. " उशीर झाला असल्याने मी आजीचा तो आग्रहही नाकारला.



शेवटी आजीने कसा उघडून एक रुपयाचं नाणं काढलं, म्हणाली, "आता हा रुपया ठेव. नाही म्हणू नको. कुणाचं फुकट काही घेऊ नाही आणि कुणाला फुकट काही देऊ नाही !"

शिक्षणाशी आणि या व्यवहारी जगाशी गरजेपुरती संबंध असणाऱ्या त्या थोर गुरुमाऊलीला जीवनाचं असं अफाट तत्वज्ञान या आद्यगुरू निसर्गानेच शिकवलं असणार.

आजीने डोक्यावर गाठोडं उचललं आणि सुनेसह चालती झाली. तिच्या नऊवारी लुगड्याकडे नजर गेली. फाटलेल्या ठिकाणी गाठी मारल्या होत्या. गाठीतल्या तिच्या मनाच्या श्रीमंतीचा मला हेवा वाटला. आजीने दिलेला तो खणखणीत रुपया, मी आजही त्या लाखमोलाच्या गुरुमंत्राची आठवण म्हणून जपून ठेवला आहे.


Ideation & Conceptualisation of Magazine: Pooja Prasun
Original Content | Edited By: Sanjay Kank
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den


kankavali

# झोपाळा

Creators Den
URBAN SPACE

## ©संजय कंक





त्याला कोणी झुला म्हणतं, कोणी हिंदोळा. कोणी चोपाळा तर कोणी झोपाळा. नावं वेगळं पण काम एकचझुलवण्याचं. पण त्या झुलवण्यात कधी मनोरंजन असतं कधी मायेचा आधार.

मानवी आयुष्यात झोपाळ्याला अनन्यसाधारण महत्व आहे. या पृथ्वीतलावर अवतरल्या पासून म्हणजे जन्मझाल्यानंतर काही क्षणात ओळख होते ती पाळण्याची. पाळणा म्हणजे झोपाळ्याचाच एक अवतार. किरकिरणारं बाळपाळणा हलू लागताच शांतपणे झोपी जातं. बाळासाठी अजून एक छानसा प्रकार म्हणजे झोळी. ही झोळी म्हणजेपाळण्याची छोटी बहीणच. मातेच्या कुशीइतकीच उबदार आणि सुरक्षित. लहान मुलं झोळीत अधिक शांतपणे झोपीजातात असं अनुभवी मंडळी सांगतात.

आपला तान्हुला काही केल्या शांत होत नसेल तर त्याची माता, एक हात बाळाच्या डोक्याखालून सरळ आणि पाठीलाआधार देत तर दुसरा हात कमरेच्या खाली धरत, हाताचा झोका करून त्याला जोजावते. मग ते रडणारं बाळ हळुहळुशांत होतं. ही जादू फक्त मातेच्या हाताचा झोकाच करू शकते.

माझं आणि झोपाळ्याचं नातं माझ्या लहानपणापासूनच अगदी घट्ट आहे. गावाकडे घरी झोपाळा होता. लाकडीतुळयांना कड्या अडकवून त्यावर झोपाळा टांगला होता. आम्ही भावंडं त्यावर बसून तासंतास झोके घ्यायचो. अतिघर्षणाने एके दिवशी लाकडी तुळ्यातील हुक तुटलं. झोका बंद झाला. नित्यक्रमात काहीतरी राहून गेल्या सारखंवाटायचं. जेवणासाठी वाढलेल्या भरगच्च ताटात मिष्टान्नच नसावं तसं वाटायचं. वडिलांना देखील झोपाळाआवडायचा, त्यामुळे लगेच सुताराला बोलावून घेतलं. धाब्याचं घर असल्याने वरची माती कोरून, लाकडी फळ्याकाढून एका तुळईला हुक बसवलं गेलं आणि झोपाळा परत सुरु झाला.


उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये चुलत, आते भावंडं यायची. घर भरून जायचं. रोजच्या दंगामस्त्यांना उधाण यायचं. बरेचदाभांडणांना कारणीभूत असायचा तो झोपाळा. झोपाळ्यावर पुढच्या बाजूला तीन आणि मागे तीन अशी सहाजणबसायचे. सगळ्यांनाच कडीजवळची जागा हवी असायची. कारण कडी धरून बसल्याने मोठ्ठा झोका घेताना पडायचीभीती नसायची आणि जे दोघे मध्ये असतील, पायाने रेटून झोका घ्यायचं काम त्यांचं असायचं.

कामधंद्याच्या शोधात गाव सुटलं. झोपाळा दुरावला. झोपाळ्याच्या या आठवणी विसरणं शक्यच नव्हतं. नाईलाजानेत्यांना मनाच्या एका कोपऱ्यात बंदिस्त करून ठेवलं होतं. कोणा परिचितांकडे जाणं झालं आणि त्यांच्या कडे झोपाळाअसला की मात्र तिथे हमखास बैठक व्हायची.

कालांतराने स्वतःचं घर बांधलं. झोपाळ्याची व्यवस्था झाली पण बाहेर पोर्च मध्ये. चारचाकी आल्यावर त्याचं तिथलंअस्तित्व देखील दोलायमान झालं. मग बागेत लोखंडी सांगाड्याचा झोपाळा आणला. पण सतत त्याचा वापर करणंशक्य होत नसे. तो घरातच हवा ह्या मतावर शिक्कामोर्तब झालं.

kankavali

मागच्या वर्षी रंगकाम करण्या अगोढ्र झोपाळा टांगण्याची घरातच विशेष व्यवस्था केली. सागवानी लाकडाचाझोपाळा, त्यावर चकचकीत पॉलीश. त्याचं रूप पाहूनच मन झोका घ्यायला लागलं. आता तर सकाळचा पहिला चहाआणि नाश्ता त्यावरच असतो. झोक्याची तालबद्ध लय, हातात वाफाळलेल्या चहाचा कप आणि सोबत पहाटेचीभक्तिगीतं, भावगीतं ऐकताना झालेली समाधी अवस्था. मला सांगा सुख म्हणजे नक्की काय असतं ? या प्रश्नाचं हेचउत्तर आहे.



अनेक कवींना, गीतकारांना या झोपाळ्याने भुलवलं आहे. त्याच्यावर अनेक गाणी लिहिली आणि गायली गेली आहेत. झोपाळ्यावर बसून झोपाळ्याविषयीची गाणी ऐकणं देखील स्वर्गसुख आहे. झोपाळ्यावर बसून त्या संथ लयीवरभूतकाळात कधी शिरतो, कळतच नाही. अनेक आठवणी ताज्या होतात. काळाच्या पडद्यामागे गेलेल्या प्रियजनांची भेटहोते. कधी ह्याच झोपाळ्यावर नव्याने वास्तवतेच देखील दर्शन होतं. कधी मनोराज्ये रचली जातात. भविष्यातीलगोष्टींची आखणी होते. कधी विचारांच्या भोवऱ्यात अडकलो तर याच झोपाळ्यावर तो गुंता नकळत सुटत जातो. भूत, वर्तमान आणि भविष्य या तिन्ही काळांना एकाच साखळीत बांधण्याचं सामर्थ्य या झोक्यात आहे.

जेव्हा काही प्रसंगी मन खूप कष्टी होतं. उलट सुलट विचारांनी सैरभैर होतं, विचारांचं थैमान सुरु असतं, मन टाहोफोडायला लागतं तेव्हा शब्दांची फुंकर घालायला अन हाताचा झोका करून शांत करायला माझी माता नसते कारणकाळाच्या ओघात मातृछत्र हरपलं आहे.

अशा वेळी आधार देतो तो हाच झोपाळा. झोपाळ्यावर बसताच त्याची आंदोलने सुरु होतात मात्र मनातील विचारांचीआंदोलने हळुहळु शमत जातात. आक्रंदणार मन शांत करण्याची जादू मातेच्या हातानंतर आहे ती फक्त या झोपाळ्यातच !




Ideation & Conceptualisation of Magazine: Pooja Prasun
Original Content | Edited By: Sanjay Kank
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den

kankavali

# अंगण

Creators Den
URBAN SPACE


©संजय कंक



"मेंदीच्या पानावर मन अजून --- रुणझुणतो अंगणा तोच गार वारा"--

कुठूनतरी गाण्याचे बोल ऐकू आले. मन अंगण या शब्द्याभोवती घुटमळलं. गावातलं घर, त्यापुढील अंगण प्रकर्षाने आठवलं. खरंच, घराची व्याख्या आणि चित्रचौकट अंगणा शिवाय पूर्णच होऊ शकत नाही.

घरात जेवढा जीव अडकतो, तितकाच तो अंगणातही अडकतो. घरात जे संस्कार मिळतात, त्याचं प्रात्यक्षिक, कळत नकळत करायला अंगणासारखी जागा दुसरी शोधून सापडणार नाही. कारण अंगणात, बराच वेळ रेंगाळला जातो. अनेक व्यक्ती भेटतात. संभाषण होते, वैचारिक द्वेवाण घेवाण होते, सवंगडी येतात, त्यांच्याशी खेळ खेळले जातात, स्पर्धा होते, वाद्द होतात, रुसवे फुगवे असतात, रस्त्याने जाणाऱ्या येणाऱ्या व्यक्तींचे दर्शन होते, क्वचित प्रसंगी जाणाऱ्या येणाऱ्यांशी संभाषण होते. अनेक फेरीवाले जाताना द्दिसतात. त्यांचं निरीक्षण करायची संधी मिळते. जिथे एकापेक्षा जास्त व्यक्ती आल्या तिथे संभाषण आलं, एखादी कृती आली, कृती आली म्हणजे द्वेहबोली अपरिहार्य असते. द्वेहबोली आणि संभाषणातून आपल्यावर झालेले संस्कार जाणीव पूर्वक किंवा अजाणता आपले ठसे उमटवत जातात. म्हणूनच अंगण हे आपल्यासाठी, बाहेरच्या प्रेक्षकां समोर प्रकट व्हायला आपल्या आयुष्यातला पहिला रंगमंचआहे.



माझ्या गावाकडील घराच्या पुढे तसं बऱ्यापैकी मोठं अंगण होतं, अजूनही आहे. माझ्या लहानपणी त्या अंगणात एकाबाजूला छानशी बाग केली होती. घरापासून सुरुवात केली तर पहिले जाई चा भरगच्च वेल होता. पुढच्या बाजूला ओळीत मोगऱ्याची चार पाच रोपटी होती. त्याच्या पुढे गुलाबाची कलमं होती. मागच्या बाजूला थोडी जागा झेंडू, तगरीसाठी होती. द्वोन केळीचे खांब उभे होते. एक पपई होती आणि जिथे जागा मिळेल तिथे गिलक्याचे, द्वोडक्याचे वेल होते. पुढच्या आणि मागच्या बाजूमध्ये तीन चार फुटांचं अंतर होतं. वरती जाई आणि गिलक्यांचे वेल छप्परासारखे पसरले असल्याने त्या चार फुटांच्या जागेवर ते द्वाट सावली धरून होते. द्वेवाला चार फुलांची आणि वेळ प्रसंगी भाजीची सोय झाली होती. म्हणजे ते अंगण विठोबा आणि पोटोबा या द्वोन्हीसाठी मद्दत करत होते. सकाळी झाडांना पाणी घातल्यामुळे त्या जागेत सावली आणि गारवा या द्वोन्ही गोष्टी हातात हात घालून नांद्दत असत. त्या गारव्याला मी खूपद्दा अभ्यास करत बसे. पुस्तकं वाचनाचा नाद्द लागला तो याच अंगणाच्या या छोट्याशा प्रसन्न जागेत.

अंगणाच्या दुसऱ्या टोकाला म्हणजे घराच्या विरुद्ध बाजूला बोरीचे तीन झाडं सरळ रेषेत होती. आता बोरी मुद्दाम लावायची गरज नसल्याने कधीकाळी त्या अशाच उगवल्या असणार. अंगणाने त्याच्या स्वभावा प्रमाणे त्यांना आपल्या अंगाखांद्यावर मोठं केलं असणार. सप्टेंबर ऑक्टोबर च्या सुमारास त्यांना बोरं यायची. बरेच पक्षी त्या बोरीवर असत. पण जेव्हा पोपट बोरं खायला यायचे तेव्हा तो पानांआड द्दडलेला पोपट बघण्याचा आनंद्द काही वेगळाच असायचा. बोरं तोडायची सोडून आम्ही सर्व मुलं तो पोपट द्दिसतो कां हेच बघत असू. बोरीच्या झाडावर एका

kankavali

विशिष्ट उंची पर्यंत चढता यायचं. मग एका काठीने टप्पोरी, अन लाल झालेली बोरं हेरायची आणि नेमकं बोर काढायचं. जेव्हा खूप सारी बोरं पिकायला यायची तेव्हा झाडावर चढून फांद्या हलवल्या की बोरांचा सडा पडायचा. तो वेचताना खूप ढंगा व्हायचा. विकतची कितीही बोरं आणली तरी झाडावरची ती बोरं खाण्यातली गम्मत काही औरच होती.

शाळा सुटली की घरी येऊन पाटी दप्तर घरात फेकलं की सगळे मुलं अंगणात हजेरी लावायचे. कधी नुसत्या गप्पाटप्पा, तर कधी नुसता धुडगूस. कधी वेगवेगळे खेळ व्हायचे. अमुक एकच खेळ हवा असं काही नव्हतं. अंगणात आलं की खरी लोकशाही असायची. जसं बहुमत असेल तो खेळ खेळायचा. असा एकही मैदानी खेळ नसेल जो आम्हीआमच्या त्या अंगणात खेळलो नसू. त्या काळचे सर्व खेळ आलटून पालटून खेळायचो. क्रिकेटवर तर विशेष प्रेम. क्वचित फूटबॉल, व्हॉलीबॉल, अगदी क्रिकेटची बॅट म्हणून वापरत असलेल्या लाकडी दांडक्याने आणि सायकलच्या ट्यूब कापून बनवलेल्या बॉल वर अजून फडके बांधून त्याचा आकार वाढवून त्याने बेसबॉल देखील खेळून व्हायचा.

अंगण खरं गजबजायचं ते सुट्टीच्या दिवशी आणि सणावारी. खराट्याने झाडून स्वच्छ अंगणात शेणाचा सडा टाकला जायचा. त्यातही ओट्याच्या पुढील जागा सारवून रांगोळी काढण्यासाठी तयार करायचो. दिवाळीत सडा, रांगोळी, रंग भरायला मजा असायची. अंगणातल्या एका कोपऱ्यात किल्ला देखील करायचो. रात्री फटाके उडवायचो. फटाक्याची लड मोकळी करून एक एक फटका अंगणात उडवायचो. न फुटलेले फटाके सकाळी अंगणात शोधायचे. गेले ते दिन गेले --!


ह्या अंगणात मंडप टाकला की घरातलं मंगल कार्य पार पडत असे. चिवडा लाडू तयार व्हायचा. ताडपत्रीवर पंगत झाली की नंतर गाद्या टाकून बैठक सजवली जायची. पै पाहुणे मग गप्पांची मैफिल सजवायचे. कार्य यथासांग पार पडलं की पाहुणे जाताना, घर आणि अंगणामुळे कार्याला शोभा आली वैगरे आवर्जून अंगणाच तोंड भरून कौतुक करत. गाव सोडलं त्याबरोबर घर, अंगण देखील नजरेआड झालं. फक्त मनाच्या अंगणात काही प्रसंगी आठवणींचे मोर थुईथुई नाचत राहिले.

मायमावशी सारखी ही घरअंगण यांची जोडी आहे असं मला वाटतं. घर जर माय असेल तर अंगण मावशी आहे. आई इतकंच कोडकौतुक मावशी करते. कदाचित किंचित जास्तच. माय मरो मावशी जगो म्हणतात ते उगीच नाही.

शहरीकरणाच्या गर्दीत आणि जागे अभावी सदनिकेच्या जमान्यात घरापुढचं अंगण गेलं आहेच. हळूहळू एकच अपत्य संकल्पना जनमनात रुजायला लागली आहे. असं झालं तर पुढची पिढी मावशी च्या प्रेमालाही वंचित होईल.

एक दिवस असा येईल की मावशी फक्त पुस्तकातल्या गोष्टीत असेल, तिची माया वाचता येईल पण अनुभवता येणार नाही आणि घरापुढचं अंगण चित्रचौकटीत दिसेल पण त्याच्या कुशीत बागडता येणार नाही. भावी पिढी असेल मावशीशिवाय पोरकी अन् अंगणाला पारखी !





Ideation & Conceptualisation of Magazine: Pooja Prasun
Original Content | Edited By: Sanjay Kank
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den


kankavali

# उंबरठा

Creators Den
URBAN SPACE

©संजय कंक





उंबरठा म्हंटल की डोळ्यांसमोर येते एक लाकडाची भरभक्कम, जाडजूड फळी. तितक्याच भक्कम लाकडी दरवाज्याच्या चौकटीचा जमिनीलगत असलेला एक भाग. यामुळे दरवाज्याला आणि पर्यायाने घराला पूर्णत्व येतं. या शब्दाचा वाक्यात जेव्हा उपयोग होतो, तेव्हा वाक्याला विशेष अर्थ प्राप्त होतो.

उंबरठ्याच्या आत पाऊल टाकू नको असं जेव्हा कोणी म्हणतं तेव्हा घरात पाऊल न टाकण्यासंबंधी दिलेला तो निर्वाणीचा इशारा असतो. याच्या अगदी विरुद्ध उंबरठ्याच्या बाहेर पाऊल टाकू नको असं जेव्हा कोणी म्हणतं तेव्हा घराबाहेर न पडण्यासंबंधी तो हुकूम असतो. म्हणजे अगदी नजरकैदच म्हणावी. घरची सून, गृहलक्ष्मी ह्याच उंबरठ्यात ठेवलेलं माप ओलांडून गृहप्रवेश करते आणि त्या घरात समरस होते. त्या घराच्या चालीरीती जपते. त्या घराचा वारसा एका पिढीतून दुसऱ्या पिढीत हस्तांतरित करण्याला हातभार लावते. या सर्वघटनांचा साक्षीदार हा उंबरठाच असतो.

कुठल्याही मंगल प्रसंगी उंबरठ्या बाहेर रांगोळी काढली जाते. उंबरठ्यावर गोपद्म काढून त्यावर हळदी कुंकू वाहतात. घरात नवजात बाळाचं आगमन, लग्नकार्य किंवा सण समारंभाच्या प्रसंगी उंबरठ्याच्या वर, दाराला तोरण बांधतात. शुभकार्याचं ते द्योतक आहे.

आपल्या प्रियजनांच्या आगमनाची खुप आतुरतेने वाट बघावी लागत असेल आणि ते प्रियजन मात्र नजरेच्या टप्प्यात दिसत नसतील तर अशा या नाजूक, हुरहूर दाटून आलेल्या, आनंद आणि उत्सुकता शिगेला पोहचलेल्या, किंचित भीतीची छाया असलेल्या, अनामिक काळजीयुक्त क्षणी मदतीला धावून येतो तो उंबरठा. असं म्हणतात कोणाच्या आगमनाची खुप वाट बघावी लागत असेल तर उंबरठ्यावर पेला पालथा ठेवावा म्हणजे पाहुणे लवकर येतात. कदाचित ही अंधश्रद्धा असेलही, पण त्यामुळे वाट बघणाऱ्याला मानसिक आधार मिळतो हे तितकंच खरं आहे.

लाडका पुत्र उज्ज्वल भवितव्यासाठी उच्च शिक्षण, उद्योगधंद्याच्या निमित्ताने किंवा परदेशी म्हणून पहिल्यांदा घराबाहेर पडतो तेव्हा आणि लाडक्या लेकीच्या कन्यादानाचा प्रसंग असे विरहाचे क्षण. तसंच प्रियजनांच्या मृत्यू सारख्या अप्रिय घटना यांचा मूक साक्षीदार देखील हा उंबरठा असतो.

विशेषतः लहान मुलं, महिला, गृहिणी सुरक्षेच्या दृष्टीने सातच्या आत घरात असाव्यात असं पूर्वी आपली वडीलधारी मंडळी नेहमी सांगत. या उंबरठ्याच्या आत व्यक्ती सुरक्षित असतात. उंबरठा नावाचा एक सुरेख मराठी चित्रपट या विषयावर आधारित आहे. या उंबरठ्यामुळे दरवाज्याची जमिनी लगतच्या बाजूची फट नाहीशी होऊन त्रासदायक जीवजंतू घरात येण्याचा धोका टळतो.

kankavali

कालानुरूप उंबरठ्याचं स्वरूप बदलत गेलं. काही वेळा फक्त मातीचे उंबरठे आढळतात. लाकडा अभावी पर्यायी घटकांचे देखील उंबरठे केलेले दिसतात. प्लायवुड वापरून कधी सिमेंटचे तर कधी कडप्प्याचे उंबरठे केलेले आढळतात. संगमरवरी उंबरठे देखील एखाद्या आलिशान घराची शोभा वाढवताना दिसतात. नंतर शहरीकरण झालं, जागेअभावी फ्लॅट संस्कृती उदयास आली. काही अपवाद सोडले तर या फ्लॅटमुळे अंगण नाहीसं झालं, परसदार नाहीसं झालं आणि हळुहळु फ्लॅट संस्कृतीत उंबरठे नाहीसे झालेले दिसतात. असं असलं तरी उंबरठ्याची जागा मात्र एकदम निश्चित आहे. उंबरठ्याचं अस्तित्व आता हवेसारखं आहे. दिसत नसली तरी ती असते तसंच. तो दृश्य स्वरूपात नसला तरी अदृश्य स्वपरुपात त्याचं तेच स्थान आहे.

मूर्त स्वरूप नसल्याने मात्र एखादा भक्त आर्ततेने देवाला आळवतो, ती आर्तता असलेलं दुनियादारी चित्रपटातील एक गाणं इथे आठवतं -

"देवा तुझ्या गाभार्याला उंबराच नाही,
सांग कुठे ठेऊ माथा कळंनाच काही
देवा कुठे शोधू तुला मला सांग ना
प्रेम केलं एवढाच माझा रे गुन्हा !"

निर्जीव असूनही आनंदाच्या क्षणांचा भागीदार, दुःखद क्षणांचा साक्षीदार, घरातील सर्वांच्या सुरक्षेसाठी जबाबदार आणि ज्याच्यामुळे घराची व्याख्या आणि दाराची चौकट पूर्ण होते तोच हा उंबरठा !




Ideation & Conceptualisation of Magazine: Pooja Prasun
Original Content | Edited By: Sanjay Kank
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den

kankavali

# स्वप्नवत सहल

©संजय कंक

Creators Den
URBAN SPACE



"केल्याने देशाटन .. " या सुविचारात, फिरण्याच्या अन् चातुर्याच्या संबंधाचे वर्णन जरी केलं असलं तरी फिरण्याने मन उल्हसित होतं हे नक्की. मनाचा तो एक व्यायाम आहे. तरतरीत मन मग खूपच सक्रिय होतं आणि अनेक कामं चुटकीसरशी पार पडतात. जसं शरीर तंदुरुस्त रहाण्यासाठी व्यायामाची गरज असते तसंच मन तंदुरुस्त रहाण्यासाठी निसर्गाच्या सानिध्यात जाण्याची गरज असते.

माझ्या लहानपणी कुठल्याही टूर्स अँड ट्रॅव्हल कंपन्यांचे पेव फुटले नव्हते की सुट्ट्यांमध्ये स्वतःची गाडी घेऊन किंवा स्वतःच प्रवासाचं नियोजन करून भटकायची पद्धत रूढ झाली नव्हती.
अगदी वसुधैव कुटुंबकम इतकी व्यापक नसली तरी, बंद द्वार संस्कृती आणि फक्त स्वतःचं कुटुंब अशी संकुचित विचारसरणी देखील तेव्हा आचरणात नव्हती. शेजारचे चार दोन घरं मिळून एकच मोठं कुटूंब असायचं. सुख दुःखाच्याआणि अडचणीच्या प्रसंगी आवर्जून सारे एकत्र असायचे. मनाला तरतरी आणणाऱ्या सहलीसाठी देखील सगळे सोबतच जायचे.

दिवाळी संपली की हवेत गारवा जाणवू लागायचा. थंडीची चाहूल लागलेली असायची. जठराग्नी प्रदीप्त झाला असल्याने भाजी भाकरीच काय पण कुठल्याही पदार्थाची आहुती स्वीकारायला शरीर आणि मन सदैव तत्पर असायचं. मग सगळ्या मंडळींना वेध लागायचे ते एखाद्या निसर्गरम्य ठिकाणी जाऊन अंगतपंगत करण्याचे. मग कोणाच्या मळ्यात जायचं याची चर्चा व्हायची. ज्याचा मळा निश्चित केला, त्याला सुट्टीच्या दिवशी अमुक इतकी माणसं डबे घेऊन येतोय असा हक्काने निरोप जायचा.




प्रत्यक्ष सहलीपेक्षा, सहलीला जाण्याची तयारी करण्यातच जास्त आनंद, उत्साह, गंमत असायची. आया बाया भल्या पहाटे उठून डब्याच्या तयारीला लागायच्या. भरीत, भाकरी, ठेचा, चटणी, दशमी, लोणचं, भाजी, पोळी डबे भरले जायचे. कुठल्याही वाहना शिवाय, पायी चालण्याचा देखील आस्वाद घेत, चार पाच कि मी अंतर रमतगमत, गप्पागोष्टी करत कधी पार होऊन, मळा कधी यायचा कळायचं देखील नाही. मळेकरी स्वागताला हजर असायचा. झाडाखाली सावलीची जागा हेरून स्वच्छ करून, गोणपाट किंवा ताडपत्री टाकून बैठक सजवलेली असायची. विहिरीवर मोटेने पाणी काढून मळ्याला पाणी देणं चालू असायचं. त्या पाटावर थंडगार पाण्याने हातपाय धुतले की चालण्याचा शिणवटा पळून जायचा. क्षणभर त्यावर विश्रांती घेतली अन विहिरीतल्या अमृततुल्य पाण्याचा घोट घेतला की मन प्रसन्नतेने भरून जायचं.

मग संपूर्ण मळ्यात एक फेरफटका व्हायचा. बांधावर एखादं पेरूचं, बोरांचं झाड दिसलं की खिसा भरून घ्यायचा. त्याचा आस्वाद घेत, त्या शांत वातावरणात पक्ष्यांची किलबिल आणि पाटाच्या वाहत्या पाण्याच्या मंजुळ आवाजात मिळणारा आनंद म्हणजे स्वर्ग सुखाची प्राप्ती. अचानक पोपटांचा थवा पेरू, बोराच्या झाडावर येऊन बसायचा. दूरवर आंब्याच्या झाडावर भारद्वाज पक्ष्याचं दर्शन व्हायचं, निरभ्र आकाशात एखादी टिटवी कर्कश्य ओरडत शांततेचा भंगकरत जायची. विहिरी जवळ एखादं बोराचं झाड वाढलेलं असायचं. त्याची थेट विहिरीत उतरणारी एक फांदी, त्याफांदीवर सुगरणीने अति सुंदर जाळीदार खोपे बनवलेले बघितले की भान हरपून जायचं.

kankavali

जवळच गुलाबांचे फुललेले ताटवे, बाजूला पिवळ्याधम्म झेंडूचा गालिचा वाऱ्याच्या झुळूकेवर डुलणारा, त्यावर फुलपाखरं बागडत असायची. मध्येच या झाडावरून, त्या झाडावर खारी शर्यत लावल्यासारख्या धावयाच्या. झाडाखाली डब्यात खाऊ ठेवला आहे आणि आज आपल्यालाही मेजवानी आहे असा संदेश त्वरित देणारा चाणाक्ष कावळा आणि क्षणात गोळा झालेले त्याचे जातभाई, सभोवती थुईथुई नाचणाऱ्या चिमण्या आणि साळुंक्या. आम्ही भान हरपून ते निसर्गसौन्दर्य आणि जीवसृष्टी आपल्या साऱ्या चित्तवृत्ती जागृत करून टिपून घेत असू.



दुपारी डबे उघडले जात. मळेकरी कांद्याची पात, टमाटे, मिरच्या, हरबरा असा वानोळा आणून द्यायचा. हसतखेळत सारे डबे कधी फस्त होत कळत नसे. डबे रिकामे होत आणि मन एका अवर्णनीय अंतरिक समाधानाने भरून जाई. संध्याकाळी, एका सुंदर दिवसाची अनुभूती घेऊन घरी येत असू.

थोडे दिवस मजेत गेले की पुन्हा एखाद्या सहलीचे मनोराज्य रचली जात. मग चर्चा सत्र सुरु होई. बघता बघता जवळच असलेल्या उनपदेवच्या सहलीची आखणी झालेली असायची. तिथे जाण्यास योग्य वाहन व्यवस्था नसल्याने, दोन बैलगाडया ठरवल्या जायच्या. बैलगाडयांवर गाद्या टाकून खडकाळ रस्त्यावरचा प्रवास सुखकर होईल इतकी बैठकव्यवस्था होई. भल्या पहाटे सगळा लवाजमा घेऊन आम्ही सारे उनपदेव ह्या साधारण पंधरा कि.मी. अंतरावरील, गरम पाण्याच्या झऱ्यासाठी प्रसिद्ध असलेल्या पर्यटन स्थळी मार्गस्थ व्हायचो.



वाटेत दुतर्फा चिंचेची झाडं असायची. आम्ही सगळे मुलं चिंचा पाडायला गाडीतून उतरून पुढे धावत जायचो. दगड मारून चिंचा गोळा करायचो. तो पर्यंत बैलगाडी पुढे गेलेली असायची. मग शर्यत लावून पळत पळत गाडी पकडायची. मध्येच कुठेतरी केळीच्या बागा असायच्या. बिनदिक्कत बागेत घुसायचं. बागवानापुढे उभं राहून त्याला ओळख द्यायची, हक्काने केळीची पाने मागायचो. मग तो वीस पंचवीस मोठ्ठी पाने काढून द्यायचा. सोबत भरदार केळीचा घड खांद्यावर घेऊन गाडीपर्यंत पोहचवायला यायचा. एक दाणा पेरला की हजारो दाणे मोबदल्यात देणाऱ्या धरणीमातेचा तो सुपुत्र. त्याचं ते दिलदार वागणं त्या मातेसारखंच असायचं. पक्का रस्ता संपून तीन चार कि.मी.चा कच्चा, खड्डे, दगडधोंडे असलेला रस्ता पार करणे म्हणजे एक दिव्यच असायचं. बैलगाडी उधळायची. शरीरात किती आणि कुठे हाडं आहेत याची जाणीव व्हायची. सगळं शरीर घुसळून निघायचं, मग थोड्याच वेळात समोर दिसायचं ते गरम पाण्याचं कुंड आणि दगडी गोमुखातून बाहेर पडणारी ती उकळत्या पाण्याची संततधार. त्या गरम, गंधकयुक्त, औषधी गुण असलेल्यापाण्यात शिरताच सारा शिणवटा निघून जायचा.

तासभर अंघोळ झाली की आयाबाया स्वयंपाकाला सुरुवात करत. कधी भरीत, भाजी, भाकरी, खिचडीचा बेत असे तर कधी डाळबट्टी. निसर्गाच्या सानिध्यात, गोवरीच्या धगीत खरपूस भाजलेली बट्टी आणि तीन दगडांच्या चुलीवर, लाकडं, काटक्यांच्या आगीवर केलेली डाळ, केळीच्या पानावर ओरपणं म्हणजे स्वर्गसुख, सहलीचं अंतिम ध्येय, जीवनाची परिसीमा. जेवण झालं की जवळच थंडगार, नितळ  पाण्याचा झरा वाहत असायचा. हाताने कोरुन, वाळूत छोटासा खड्डा केला की त्यात पाणी जमा व्हायचं. ओंजळभर पाणी प्यायलं की तृप्तीचा ढेकर आलाच पाहिजे. वर्षभर पुरेल इतकी ऊर्जा, उत्साह या एका सहलीतून मिळायचा. पुढच्या वर्षी परत सहलीला येण्याचं निश्चित करून खूप समाधानाने परतीची वाट धरायचो.

kankavali

काळ बदलला. औद्योगिकरण, अधुनिकीकरण, शहरीकरण, यांच्या मोहात अडकून सिमेंटची जंगलं वाढत चालली. निसर्ग आक्रसत चालला. पक्षी आता प्राणिसंग्रहालयातील पिंजऱ्यात दिसतात. थोड्याच दिवसात फक्त पुस्तकातील चित्रात दिसतील. निसर्ग चक्र बदलत चाललं. गोमुखातुन वाहणारी अक्षय संततधार आटली. कधी काळी हाताने उकरताच पाणी लागायचं तिथे शेकडो फूट खोल जमीन खणून यंत्र दमतात पण पाणी लागत नाही. पुढच्या पिढीची निसर्ग संपत्ती आपण सारे दोन्ही हाताने उधळून त्यांना कफल्लक बनवतोय.

स्वप्नवत वाटावी अशी निसर्ग सहल आता कोणाच्याच नशिबी नाही ही सल आयुष्यभर मनी रहाणार, अश्वथ्थाम्याच्या कपाळावरील वाहत्या जखमेसारखी, निरंतर !






Ideation & Conceptualisation of Magazine: Pooja Prasun
Original Content | Edited By: Sanjay Kank
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den

kankavali

# आकाशवाणी


Creators Den
URBAN SPACE

©संजय कंक



"आकाशवाणी ......, ..... आपल्याला बातम्या देत आहे...... " सकाळी सात वाजले की हे वाक्य वेगवेगळ्या वृत्तनिवेदकांच्या भारदस्त आवाजात, रेडिओवर ऐकत आमच्या लहानपणी दिवस सुरु व्हायचा. दूरदर्शन तेव्हा दिल्ली, मुंबई सोडलं तर फारसं कुठे नव्हतंच. त्यामुळे जगाशी संपर्कात राहण्यासाठी वृत्तपत्र आणि आकाशवाणी हि दोन प्रभावी माध्यमे होती.

खिशाला परवडणारी होती की नव्हती हा चर्चेचा मुद्दा व्हावा कारण त्याकाळी असलेली जीवनशैली, उत्पन्न आणि सवयी बघता फार थोड्या घरी वर्तमानपत्र आणि रेडिओ असायचा. बंद दार संस्कृती उदयाला यायची होती. वसुधैव कुटुंबकम अशी शिकवण अंमलात असायची. सकाळी उठल्यावर दूध, साखर संपलेली आढळली तर हक्काने शेजारी जाऊन उसनं घेऊन येण्याचा परवाना राजरोस मिळालेला असायचा आणि कोणाला त्यात गैर वाटत नसायचं. तर मग वृत्तपत्र शेजारी असेल तर पहाटे दाराला लावलेलं असल्यास त्या घरातल्यांनी वाचण्या अगोदर ताज्या वृत्तपत्राची घडी शेजाऱ्यांनी मोडून कुस्करलेलं ते वृत्तपत्र सावकाश परत देण्यात कोणाला त्याचा विधिनिषेध नसायचा. आजच्या काळात हे खूप असंस्कृत लक्षण ठरावं. बरेचदा वृत्तपत्र हा प्रकार म्हणजे सार्वजनिक वाचनालयात जाऊन वाचण्यासाठी असतं हाच समज असायचा.




रेडिओची देखील फारशी वेगळी तऱ्हा नव्हती. चार दोन घराआड असायचा. बातम्या ऐकायला मंडळी जमा होत. विशेषतः निवडणुकीचा निकाल ऐकताना तर प्रत्येक निकाला नंतर जोरदार प्रतिक्रिया व्यक्त व्हायच्या. जणू एखादं जोशपूर्ण भाषणच असायचं. निवडणुकीच्या प्रचारसभेत देखील इतकं आवेशपूर्ण भाषण नसावं. चाय पे चर्चा हा कार्यक्रम त्याकाळी सुचला असावा.

रेडिओ घेणं त्याकाळी चैनीची गोष्ट. एखादी दुर्मिळ गोष्ट किंवा उंबराचं फुल हाती यावी अशी. रेडिओचं रूपही भारदस्त होतं. मोठ्या लाकडी चौकटीत, पुढच्या बाजूला जाळीदार भागात स्थानदर्शक पट्टी, काटा आणि आवाज  नियंत्रण करणारं बटन. नंतरच्या काळात त्याची विविध रूप, लहान आकारात ट्रान्झिस्टर म्हणून ओळख पावलेली, प्रसिद्ध झाली. लाकडी खोका असलेला रेडिओ एका जागी बैठक मारून स्वस्थ बसत असे. हे म्हणजे पूर्वीच्या एकत्र कुटुंबाच्या किंवा मोठ्या खटल्याच्या, सधन, खात्यापित्या घरातली भारदस्त मालकीण एका जागी बसून किल्ल्यांचा जुडगा कमरेला लावून कारभार हाकते तसं वाटे. तर त्याचं आधुनिक रुपडं कुठेही फिरायला मोकळं म्हणजे आधुनिक काळातील चवळीची शेंग, शेलाटी बांध्याची किंवा झिरो फिगर अशी अंगकाठी असलेली एखादी नवयौवना गावभर विनापाश हिंडावी तशी. रेडिओ कोणता घ्यावा ? यावर चर्चा होते तेव्हा प्रकर्षाने आठवण होते ती रेडिओ बनवणाऱ्या एका नावाजलेल्या ब्रॅण्डच्या जाहिरातीत दिसणाऱ्या मर्फी बॉयची.

त्याकाळी ध्वनिलहरी आकर्षून घ्यायला रेडिओला विशिष्ट जाळी सदृश्य अँटिना किंवा एरिअल आणि वीजरोधक अर्थिंग आवश्यक असे. तरीही रेडिओचा मूड खूप वेळा बिनसलेलाच असे. सारखा खरखर करत रडगाणं चालू ठेवायचा. एखाद्या व्रात्य कार्ट्या सारखा त्याचा लहरी स्वभाव असे. रेडिओ घेतल्यावर त्याचा परवाना घेणं बंधनकारक

होतं. आवश्यक ती माहिती आणि रक्कम भरून हा परवाना मिळायचा. दरवर्षी नूतनीकरण आवश्यक. १९६४ मध्ये अस्तित्वात आलेला हा कायदा १९९१ मध्ये रद्द झाला.

रेडिओवर सकाळी सातच्या बातम्या झाल्या की पाठोपाठ नंतर बरेच कार्यक्रम असायचे. शेतीविषयक माहिती, विज्ञानजिज्ञासा, हिंदी मराठी गाणी, गप्पा गोष्टी, श्रुतिका, कीर्तनं, प्रवचनं, संतवाणी, संस्कृत, हिंदी बातम्या असा भरगच्च कार्यक्रम असायचा. त्या दिवसभरात काय प्रसारित होणार हे कळावं म्हणून कार्यक्रमाची रूपरेषा सांगायचे.


सकाळी अकरा वाजता कामगार सभा हा मराठी गाण्यांचा कार्यक्रम सुरु होई. या कार्यक्रमाशी विशेष सख्य, कारण कामगार सभा सुरु झाली की शाळेत जायच्या वेळेचा हा संकेत. टेकाडे भावजी हि त्याकाळी गाजलेली श्रुतिका रात्री असायची. गप्पागोष्टी करता करता अनेक सामाजिक विषय, सद्य परिस्थिती वरील भाष्य त्यात गुंफलेलं असायचं.

बिनाका गीतमाला हि त्याकाळची सर्वात गाजलेली हिंदी गाण्यांची मालिका. अमीन सयानींच्या जादुई आवाजाने अजरामर झालेली. एकापेक्षा एक सुंदर गाण्यांच्या साजाने अलंकृत झालेली. नंतर कधीतरी तिचं नामकरण सिबाका गीतमाला झालं तरी सर्वमुखी बिनाका गीतमाला हेच नाव जास्त रूळलेलं. कन्येच्या विवाहा नंतर तिचं नाव बदललं तरी माहेरचं पाहिलं नाव नकळत जिभेवर यावं आणि नंतरचं नाव फक्त कागदोपत्री राहावं अगदी तसा हा प्रकार. कॉलेजला असताना दर बुधवारी नऊ वाजता न चुकता रेडिओ भोवती गर्दी व्हायची आणि पहिलं गाणं कोणतं असणार यावर पैज लागायची. मंतरलेले दिवस होते ते.




काळाचा महिमा काय वर्णावा ?  हळूहळू दूरचित्रवाणी अर्थात टीव्ही घरोघरी दिसू लागले. लोकप्रिय झाले. त्यावरचे बरेच कार्यक्रम आकाशवाणी सारखेच म्हणजे बातम्या, गाणी,  मालिका वैगरे. कृष्णधवल टीव्ही, त्यांचा तो उंच अँटीना, चित्रापेक्षा मुंग्या अधिक आणि स्वर म्हणून खरखर जास्त असा एक जमाना होता. त्यात अनेक सुधारणा होत गेल्या, रंगीत संच आले, बोजड आकार जाऊन स्लिम ट्रिम झाले, पिक्चर क्वालिटी सुधरली, HD डिजिटल म्हणतात तशी झाली. टीव्ही च्या या संपूर्ण उत्क्रांतीत तो रेडिओ दुर्लक्षित झाला. राजपुत्राला राज्याभिषेक होताच राजानेवान प्रस्थाश्रम स्वीकारावा तसा रेडिओ आपल्या सर्वांच्या जीवनातून नाहीसा झाला.


राखेतुन फिनिक्स पक्ष्याने भरारी घ्यावी तशी अचानक काही वर्षांपासून या आकाशवाणीने उसळी घेतली. रेडिओ परत दिसू लागले. रेडिओवरील पूर्वीच्या निवेदिकेची जागा आता रेडिओ जॉकीने घेतली. संभाषण कला, वाक्चातुर्य, हजरजबाबी व्यक्तींसाठी हि फक्त रोजीरोटी असं स्वरूप न राहता यशस्वी कारकीर्द, नावलौकिक अशा संधी उपलब्ध झाल्या.




रेकॉर्ड केलेले, यू ट्यूबवरचे किंवा इतर माध्यमांद्वारे संग्रहित असलेले गाणे सारखे ऐकून मन सरावून जातं पण कात टाकून लखलखीत झालेल्या आणि नव्या जोशात, नव्या आवेशात फुत्कार टाकत नाविन्यपूर्ण कार्यक्रम घेऊन आलेल्याया आकाशवाणीने, अचानक आपल्या आवडीचं एखादं सुंदर गाणं ऐकवत, आनंद द्विगुणित करुन दिला. कॅलिडोस्कोपमध्ये नवनव्या मोहक आकृत्या बघताना प्रत्येकवेळी मन हर्षोल्हासित व्हावं तोच अनुभव असे विस्मृतीत गेलेले, खूप आवडीचे, काही आठवणींचे धागे चिकटलेले गाणे अचानक ऐकताना मिळतो.

kankavali

लहानपणी द्विवाळीचा आनंद लुटताना स्मरणात आहे ते आकाशवाणीवरचं कीर्तन. भल्या पहाटे वडील आम्हा भावंडांना साखरझोपेतून उठवायचे तेव्हा रेडिओवर कीर्तन नुकतंच सुरु झालेलं असायचं. द्विवाळीच्या पहाटे नरक चतुर्दशीला, गुलाबी थंडीत अभ्यंग स्नानाच्या वेळेस हमखास असणाऱ्या कीर्तनात, जेव्हा श्रीकृष्ण नरकासुराचा वध करतात तेव्हा कानावर पडणारे ते मंत्रमुग्ध स्वर आणि मोती साबणाच्या, सुगंधी उटण्याच्या साथीने, आईच्या प्रेमळ हाताने अभ्यंगस्नानासाठी डोक्यावर कडकडीत पाण्याचा तांब्या ओतताना मिळणारं सुख म्हणजे खरी द्विवाळी. अजूनही दरद्विवाळीत, रेडिओवर हे कीर्तन सुरु असतं. लहानपणीच्या द्विवाळीतील हे सुख परत अनुभवायची आणि त्या गोड आठवणीत हरवून जायची इच्छा आजही पूर्ण होते ती या आकाशवाणीमुळेच !






Ideation & Conceptualisation of Magazine: Pooja Prasun
Original Content | Edited By: Sanjay Kank
Production | Proof Reading: Team Voice Vista
Designed by: Creators Den

kankavali



Edition
03
April 2024

Voice Vista
VENTURE BY POOJA PRASUN
www.thevoicevista.com